स्थानिक स्वराज्य संस्थेस माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत....

**खडकी कटक मंडळ, खडकी, पुणे अंतर्गत कर्नल भगत इंग्लिश स्कुल, खडकी, पुणे.**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१५७१/एसएम- २**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:-१६ जानेवारी, २०१९

**वाचा -**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:नमाशा-२००९/(४९७/ ०९)/माशि-१, दिनांक ११ जून, २००९.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक:अमाशा/२०१८-१९/खडकी कॅन्टोमेंट/माध्य-ब ३०१/१३०२८, दि. २१.१२.२०१८.

**प्रस्तावना -**

खडकी कटक मंडळ, खडकी, पुणे अंतर्गत कर्नल भगत इंग्लिश स्कुल, खडकी, पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांनी संदर्भ क्र. (२) अन्वये शासनास सादर केला आहे. सदर शाळेस परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

महासष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत खडकी कटक मंडळ, खडकी, पुणे अंतर्गत कर्नल भगत इंग्लिश स्कुल, खडकी, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या नवीन प्राथमिक ते माध्यमिक (इ. १ ली ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) शाळेस सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

I. सदर शाळेचा खर्च कटक मंडळाने स्वत:च्या उत्पन्नातून/स्वनिधीतून सुरू करावा. राज्य शासनावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचे आर्थिक दायित्व न येता सदर शाळा सुरू करावी.

II. माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांबाबतचे शासनाचे प्रचलित धोरण व निकष यांचे पालन करणे तसेच शाळेमध्ये आवश्यक वर्गखोल्या, सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील.

III. शासनाकडून वेळावेळी देण्यात येणाऱ्या निदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

IV. परवानगी दिलेल्या शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या भरती संदर्भात शासनाचे प्रचलित आदेश, नियम व धोरण लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, पुणे.
७. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, खडकी कॅन्टोमेंट बोर्ड, खडकी, जि. पुणे.
९. निवडनस्ती (एसएम २)